## मानोरा रोडवर अपघातः महिलेचा मृत्यू, भाचा जखमी

**दारव्हा** : दारव्हा- मानोरा रस्त्यावरील पंजेतन दर्गा परिसरात सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास दुचाकी अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला, तर तिचा भाचा जखमी झाला आहे. मृत महिलेचे नाव मंदा लक्ष्मण बेले (५०), रा. बोथ असे आहे. तिचा भाचा राहुल गजानन खटारे (२४), रा. बोथ हा जखमी झाला आहे. मंदा बेले या राहुलसोबत दुचाकी (क्र. एमएच २९ एई ६८९७) वरून दारव्हा येथे येत असताना, मागून भरधाव वेगात आलेल्या दुसऱ्या दुचाकीने जोरदार धडक दिली. या धडकेमुळे मंदा बेले यांचा तोल जाऊन त्या रस्त्यावर कोसळल्या आणि डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर नागरिकांनी तातडीने मदतकार्य केले. दरम्यान पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून दुचाकी क्रमांकाची नोंद घेतली आहे.

# अवैध उत्खननाविरोधात आ.बाळासाहेब मांगुळकर विधानभवनात आवाज उठविणार?



**यवतमाळ, दि.२९, महासागर प्रतिनिधी**: यवतमाळ तालुक्यात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या अवैध उत्खननाविरोधात आक्रमक भूमिका घेने आवश्यक असून, या प्रश्नावर विधानभवनात आवश्यक.मांगूळकर आवाज उठविणार काय? यवतमाळचे आमदार बाळासाहेब मांगुळकर यांची भेट घेऊन ही मागणी नागरिकांनी केली आहे.

भेटीत शिष्टमंडळाने तालुक्यातील विविध भागांतील अवैध उत्खनन, महसूल विभागाची उदासीनता, आणि तक्रारींचा तपशीलवार आढावा आमदारांसमोर मांडला. शिष्टमंडळाने यापूर्वी महसूल अधिकाऱ्यांना निवेदन देत अवैध उत्खनन थांबवण्याची मागणी केली होती. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. त्यानंतर जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांच्याकडेही तक्रारी करण्यात आल्या.

परिस्थिती बदलली नाही म्हणून महसूल मंत्र्यांचीही भेट घेण्यात आली. मंत्र्यांनी जिल्हाधिकारी यांना पुणे मॉडेलच्या धर्तीवर ड्रोन सर्वेक्षण करून कारवाई करण्याचे आदेश दिले. पण प्रत्यक्षात महसूल विभागाकडून अद्याप कोणतेही ठोस पाऊल उचलण्यात आलेले नाही. या पार्श्वभूमीवर शिष्टमंडळाने आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्याशी चर्चा करून, हा गंभीर विषय विधानभवनात मांडण्याची विनंती येथील सामान्य नागरिकांनी केली आहे.आमदार मांगुळकर यांनी या संपूर्ण प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत, लवकरच हा मुद्दा विधानभवनात मांडण्याचे आश्वासन नागरिकांना दिले आहे.

स्थानिक नागरिकांमध्ये दिवसेंदिवस वाढणाऱ्या अवैध उत्खननामुळे नैसर्गिक पर्यावरणाचा ऱ्हास, शेतजमिनींचे नुकसान आणि पायाभूत सुविधांवर होणारा परिणाम याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. काही राजकीय पक्ष व संगठना मात्र अवैध उत्खननविरुध्द आवाज उठवून अधिका-यांना ब्लैकमेल करतात.

## पालकमंत्री ना.संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त आज विविध कार्यक्रम

▪ विश्रामगृहावर स्वीकारणार नागरिकांच्या शुभेच्छा



**यवतमाळ , दि.२९, महासागर प्रतिनिधी**: शिवसेनेचे नेते, राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या सोमवार, दि. ३० जून रोजी शिवसेनेच्या वतीने विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिग्रस, दारव्हा, नेरसह जिल्ह्यात विविध ठिकाणी हे सामाजिक कार्यक्रम होणार आहे.

दरम्यान, पालकमंत्री संजय राठोड हे सोमवारी वाढदिवसानिमित्त यवतमाळच्या विश्रामगृहावर नागरिकांच्या शुभेच्छा स्वीकारणार आहेत.

सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत ते विश्रामगृह येथे नागरिकांना भेटणार आहेत. पालकमंत्री संजय राठोड यांना शुभेच्छा देण्यासाठी येणारे शिवसैनिक, हितचिंतक यांनी विश्रामगृह येथेच यावे, असे आवाहन शिवसेनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेवर शिंदे, कोरडेची निवड



**यवतमाळ, दि.२९, महासागर प्रतिनिधी**: रविवारी दुपारी १.०० वाजता होटेल टुलीप गार्डन्स येथे महाराष्ट्र राज्य संघटनेकरिता जिल्हा कार्यकारिणीतून दोन प्रतिनिधिंची निवड करण्याकरीता सभा घेण्यात आली.

या सभेकरिता महाराष्ट राज्य संघटनेच्यावतीने वर्धा येथील दोन निवडणूक अधिकारी म्हणून नरेश शेवाळे, सतीष सहारे यांच्या उपस्थितित अशोक शिंदे, किरण कोरडे यांची निवड स्थानीक कार्यकारिणी सदस्यांनी केली. या दोन प्रतिनिधिना महाराष्ट राज्य संघटनेचे प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली.

निवडणूक अधिकारी नरेश शेवाळे आणि सतिष शहारे यांनी घोषित केले. यावेळी कार्यकारिणी पदाधिकारी राजू हनवते, श्रीराम खत्री, तुषार गुजलवार, मदन केळापुरे, सचिन कदम, प्रवीण आगलावे, सुनील बोरकर, रवींद्र चव्हाण, महाराष्ट्र वृत्तपत्र संघटनेची स्थानिक प्रतिनिधी संतोष शिरभाते किशोर भेदरकर उपस्थित होते.

## करवाढीविरोधात नागरिकांत असंतोष

**मारेगाव**: येथील नगरपंचायत प्रशासनाने मोठ्या घाईघाईत मालमत्ता कर वाढविण्याचा निर्णय घेतल्याने या विरोधात शहरातील नागरिकांत प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. याबाबत गजानन किन्हेकर यांच्या नेतृत्वात नगरपंचायत मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन कर कमी करण्याची मागणी केली. मुख्याधिकाऱ्यांनी या वाढीव कराचे समर्थन केले. त्यामुळे वाढीव कराला विरोध करण्यासाठी रविवारी सभा झाली.

## पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते बोरी अरब येथील पुलाचे लोकार्पण आज



**दारव्हा , दि.२९, महासागर प्रतिनिधी**: अर्थसंकल्पांतर्गत अंजनगाव मूर्तिजापूर कारंजा दारव्हा यवतमाळ राज्यमार्ग क्र.२८२ वरील बोरी अरब येथील मोठ्या पुलाचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या शुभ हस्ते सोमवार दि. ३० जून रोजी दुपारी चार वाजता करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम प्रा. डॉ.अशोक उईके मंत्री आदिवासी विकास तथा पालकमंत्री चंद्रपूर जिल्हा, श्री इंद्रनील नाईक, राज्यमंत्री उद्योग सार्वजनिक बांधकाम (सा. उ. व.) उच्च व तंत्र शिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद व जलसंधारण, खा. संजय देशमुख, खा. प्रतिभा धानोरकर, खा. नागेश पाटील आष्टीकर, आ. भावना गवळी, आ. किरण सरनाईक, आ. धीरज लिंगाडे, आ. प्रा. राजू तोडसाम, आ. बाळासाहेब मांगुळकर, आ. संजय दरेकर, आ. किसन वानखडे यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ यवतमाळ, कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभाग यवतमाळ यांनी केले आहे.

# पाचपैकी एकही शिक्षक शाळेत हजर नाही

▪ चिखली येथील नागरीकांचा आंदोलनाचा इशारा



**उमरखेड, दि.२९, महासागर प्रतिनिधी**: येथील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेल्या पाच शिक्षकांपैकी एकही शिक्षक वेळेवर न आल्याने पालकांनी पाल्यांसह शिक्षकांना घेराव घातला. ही घटना शनिवारी सकाळी घडली. चिखली येथे नियमित शिक्षक न आल्यास यापुढे तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला.तालुक्यातील बंदी भागात चिखली वन हे गाव असून येथे प्राथमिक जिल्हा परिषदेची शाळा आहे. या शाळेत ११५ विद्यार्थी ज्ञानार्जनाचे काम करतात. परंतु २३ जूनपासून शाळा सुरू झाल्या असल्या तरी आजपर्यंत पाच पैकी एकही शिक्षक कधीच शाळा उघडण्याच्या वेळेवर येत नसल्याच्या तक्रारी पालकांनी गटशिक्षण अधिकारी व गटविकास अधिकारी यांच्याकडे केल्या. मात्र, या तक्रारींची दखल घेतली नाही.शनिवारी सकाळी साडेआठ वाजेपर्यंत एकही शिक्षक शाळेवर आला नव्हता. एवढेच नव्हे तर शाळेचे कुलूप देखील उघडण्यात आले नव्हते. त्यामुळे संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी कृउबासचे माजी उपसभापती भैय्या पाटील नाईक यांच्या नेतृत्वात सरपंच सुधाकर जाधव, मोहन नाईक, रवी जाधव, किशोर चव्हाण, धुतराम पवार, ज्ञानेश्वर शेळके, सुरज राठोड, गोकुल राठोड, सतीश राठोड आदी नागरिकांसोबत शाळेजवळ जमा होऊन विद्यार्थ्यांसहित शिक्षकांची वाट पाहिली. दरम्यान, एक-एक शिक्षक शाळेत येत होता तर मुख्याध्यापिका या नऊ वाजता शाळेवर आल्या. यावेळी शिक्षकांना पालकांचे समाधान होईल, असे उत्तर देता आले नाही. त्यावरही पालकांनी नाराजी व्यक्त केली. शिक्षक वेळेवर न आल्याने विद्यार्थ्यांनी शाळेच्या गेटसमोरच बसून ठिय्या दिला.

यावेळी पालकही उपस्थित होते. बंदी भागात येणाऱ्या २२ गावांत मोठ्या प्रमाणात जिल्हा परिषदेच्या शाळा असून या भागात शिक्षक नियमितरीत्या शाळेवर येत नाहीत. एकीकडे शिक्षणावर शासन जोर देत आहे तर दुसरीकडे अशा काही शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन मिळत नसेल तर या गंभीर बाबीकडे गटशिक्षणाधिकारी, गटविकास अधिकारी यांनी लक्ष देऊन शिक्षकांना नोटिसा बजावाव्यात अशी मागणी ग्रामस्थांनी केली. सोमवारपासून शाळा उघडताच शिक्षक वेळेवर येणार की नाही. शिवाय चिखली वन येथील पालक व गावकरी काय भूमिका घेतात याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## भारत फायनान्सची फसवणूक करणाऱ्या व्यवस्थापकास अटक



**पुसद, दि.२९, महासागर प्रतिनिधी**: तालुक्यातील शेंबाळपिंपरी येथील भारत फायनान्शियल ईक्लूजन लिमिटेड कंपनीच्या मॅनेजर व शाखा व्यवस्थापकाने लोकांनी कर्जाचे भरलेले १६ लाख ३० हजार ३३४ रुपये लांबवले. हा प्रकार गेल्या वर्षात दोघांनी संगनमत करून केला होता. या प्रकरणी संदीप माधवराव टिपरेसवार यांनी दिलेल्या तक्रारीवरून खंडाळा पोलिसांनी व्यवस्थापक ज्ञानेश्वर चक्रधर भोयर रा. देवठाणा, हिंगोली, प्रदीप पांडुरंग कोरडे (वय ३२) वर्ष रा. हिप्परगा, नांदेड या दोघांविरोधात गुन्हे नोंद केले होते. या गुन्ह्यातील निष्पन्न फरार आरोपी ज्ञानेश्वर चक्रधर भोयर (वय २५) वर्ष रा. देवठाणा ता. जि. हिंगोली याला अटक केले आहे. तो पुसद तालुक्यातील मारवाडी फाटा परिसरात थांबलेला आहे, अशी गोपनीय माहिती एलसीबी पथकाला मिळाल्याने दि. २७ जूनला त्याला. ताब्यात घेऊन पुढील तपास कामे खंडाळा पोलिस ठाण्याच्या ताब्यात दिले आहे. या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, पुसद तालुक्यातील शेंबाळपिंपरी येथे भारत फायनान्शियल ईक्लूजन लिमिटेड कंपनी आहे. या कंपनीत व्यवस्थापक म्हणून ज्ञानेश्वर भोयर आणि शाखा व्यवस्थापक पदावर प्रदीप कोरडे कार्यरत होते. या शाखेतून परिसरातील नागरिकांना लाखो रुपये फायनान्स स्वरूपात कर्ज देण्यात आले आहे. मात्र, मॅनेजर आणि शाखा व्यवस्थापक या दोघांनी पैस लंपास केले. हा गंडा सप्टेंबर २०२३ ते जून २०२४ या कालावधीत घालण्यात आला. फसवणूक झाल्याचे उघडकीस येताच दोघांनाही पैसे भरण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, मॅनेजर आणि शाखा व्यवस्थापकाने पैशाचा भरणा केलाच नाही. शेवटी बुधवारी नांदेड जिल्ह्यातील गोरठा येथील संदीप टिपरेसवार यांनी फायनान्स कंपनीची १६ लाख ३० हजार ३३४ रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार केली.

## सेवाज्येष्ठ होऊनही पदोन्नती नाकारली

**यवतमाळ**: वनविभागातील वनपालांना सेवेत ३० ते ३६ वर्षांचा कालावधी पूर्ण झाला आहे. त्यानंतरही त्यांना वनक्षेत्रपाल म्हणून पदोन्नती देण्यात आली नाही. राज्यात वने, वन्यजीव व सामाजिक वनीकरण या तीनही संवर्गात वनक्षेत्रपालांची १९१ जागा रिक्त आहे. त्यानंतरही सेवाज्येष्ठांना येथे सामावून घेण्यात आलेले नाही. नागपूर येथे नुकत्याच झालेल्या पदोन्नती समितीच्या बैठकीत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक सहसचिव उपस्थित होते. त्यांच्यापुढेही हा मुद्दा ठेवण्यात आला. महाराष्ट्रात ५६० वनपालांची नावे निवड सूची झोनमध्ये होती. यात २०१३ ते १४ पात्र उमेदवारातून सरळसेवेने घेतलेले वनपाल सेवाज्येष्ठ ठरविले जात आहे. त्यामुळे इतर सेवाज्येष्ठांवर अन्याय होत आहे. यामुळेच सेवाज्येष्ठ वनपालांनी नागपूर मॅटमध्ये दाद मागितली. मात्र, तेथे निकाल लागला नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. तेथेही शासनाकडून संदिग्ध भूमिका घेण्यात आल्याने सेवाज्येष्ठांच्या पदोन्नतीचा तिढा कायम आहे. सेवेत मागून आलेल्या वनपालांना वनक्षेत्रपाल या पदावर पदोन्नती दिली जात आहे.

# गव्हर्नमेंट हायस्कूलमध्ये गरजू विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकांचे वाटप

▪ शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा उपक्रम



**यवतमाळ, दि.२९, महासागर प्रतिनिधी**: येथील गोधणी रोडवरील जिल्हा परिषद गव्हर्नमेंट शाळेतील नवव्या वर्गाच्या गरजू विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम शाळेतील माजी विद्यार्थ्यांकडून राबविण्यात आला. विशेष म्हणजे शाळेच्या सन १९७४ व ७५ च्या हायर मॅट्रीक बॅचच्या माजी विद्यार्थ्यांकडून यापुर्वीही अनेक उपक्रमाअंतर्गत गरीब होतकरु विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाला यवतमाळ पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी पोपेश्वर भोयर, माजी नगरसेविका तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य संगीता कासार, माजी विद्यार्थी अरुण सरागे, अनिल अंबाडकर, अभय निसाळ, शाळेचे मुख्याध्यापक साहेबराव पवार, शाळेचे शिक्षक सुनिल गावंडे, संदीप मारगाये, प्रकाश साबळे, अहमद असलम, सुनिल बरमदे, शालीनी ठाकरे, सिमा सिडाम आदि शिक्षक उपस्थित होते. व्यासपीठावरील मान्यवरांचे रोपटे देऊन स्वागत करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक साहेबराव पवार यांनी प्रास्ताविकातून शाळेचे माजी विद्यार्थी शाळेला व विद्यार्थ्यांना करीत असलेल्या मदतीबद्दल माहिती दिली तसेच त्यांनी केलेल्या मदतीबाबत कृतज्ञता व्यक्त केली. माजी विद्यार्थी अरुण सरागे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना विद्यार्थी दशेतील गतकाळातील आठवणींना उजाळा दिला. शिका, मोठे व्हा, आपल्या शाळेचे, राज्याचे व देशाचे नाव उज्वल करा असा संदेश विद्यार्थ्यांना दिला. ज्या शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक विद्यार्थ्यांच्या उन्नती करीता शिकविण्याच्या कार्या सोबतच माजी विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहून मिळेल ती मदत स्वीकारण्यास जीवाचा आटापिटा करतात, त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे भविष्य निश्चितच उज्वल आहे अशी भावना व्यक्त केली. गटशिक्षणाधिकारी भोयर यांनी आपले विचार मांडतांना समाजसेवेचे भान ठेवून माजी विद्यार्थी शाळेला व शाळेतील विद्यार्थ्यांना करीत असलेल्या मदतीबद्दल समाधान व्यक्त केले. या मदतीचा स्वीकार करून त्याचा उपयोग अभ्यासासाठी करा, चांगले करीअर घडवा, मोठी स्वप्ने पाहून ती साकार करण्यासाठी मेहनत घ्या, चांगले प्रशासक बना असा मोलाचा सल्ला दिला. याप्रसंगी इयत्ता नववीतील गरजू विद्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते पुस्तके वितरित करण्यात आली.

विनामूल्य पुस्तके मिळाल्याचा आनंद गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या चेह-यावर स्पष्ट जाणवत होता. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रकाश साबळे यांनी केले.



**मान्यवरांचे हस्ते वृक्षारोपण**

या कार्यक्रम प्रसंगी शाळेच्या परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम सुध्दा घेण्यात आला. सन 1975 च्या बॅचचे डॉ. विनोद डेहनकर यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणाचे महत्व पटवून देत त्यांनी सर्वच विद्यार्थ्यांना वृक्षारोपण करण्याचे आवाहन केले.

## दिग्रसला चोरट्यांचा हैदोस; दागिन्यांसह रक्कम लंपास

**दिग्रस, दि.२९, महासागर प्रतिनिधी**: शहरासह तालुक्यातील चोरट्यांनी हैदोस घातला असून एकाच दिवशी तीन घरे फोडण्यात आले आहेत. दोन ठिकाणी चोरट्यांचा डाव फसला. मात्र एका घरातून लाखोंच्या दागिन्यांसह रोख लंपास करण्यात आली. ही घटना दिग्रस शहरातील विराट नगर येथे शुक्रवारी दि. २७ जूनच्या मध्यरात्री घडली. या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली असून या चोरट्यांच्या मुसक्या आवळण्याचे आव्हान पोलिसांसमोर येवून ठेपले आहे. या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितिनुसार, शहरातील विराट नगर येथील ज्ञानेश्वर गवई हे देवदर्शनासाठी बाहेरगावी गेले होते. याच संधीचा फायदा घेत तीन अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप व दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर कपाटातील सोन्याचे कानातले कर्ण फुले तीन ग्रॅम, सोन्याचे २४ मणी पोत, सोन्याची अंगठी पाच ग्रॅम व चांदीच्या तीन अंगठ्या अंदाजे सात ग्रॅम व नगदी पाच हजार असा लाखोंचा मुद्देमाल लंपास केला. तक्रारीवरुन गुन्हा दाखल केला आहे.

## ढाणकी येथे शिवसेना पक्ष प्रवेश



**ढाणकी, दि.२९, महासागर प्रतिनिधी**: शिवसेना शिंदे गटाचा स्थापना दिवस संपन्न झाला.यावेळी शहर प्रमुखपदी संजय सलेवाडची निवड करण्यात आली. शिवसेनेचा पक्षप्रवेश सोहळा संपन्न झाला. स्थापनेचा सदर कार्यक्रमात जवळपास ढाणकी नगरीतील दोनशे युवा, पुरुष व महिलांनी शिवसेनेत प्रवेश घेतला. याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख यशवंत पवार,कालींदाताई पवार महिला जिल्हा संपर्कप्रमुख,वैशालीताई मासाळ महिला जिल्हाप्रमुख, चितांगराव कदम सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# भालर वसाहत रस्ता दुरूस्तीसाठी लेखी आश्वासन



**वणी, दि.२९, महासागर प्रतिनिधी**: भालर वसाहत ते लाठी गावाला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याच्या दुरावस्थेच्या पार्श्वभूमीवर लाठी भालर वसाहत ग्रामपंचायत सदस्य ॲड.राहुल खारकर यांच्या नेतृत्वात स्थानिक लाठी गावातील नागरिकांनी घेतलेल्या रस्ता रोको आंदोलनाला लेखी आश्वासनानंतर यश मिळाले.

वेल्हाळा बाजार रोड चौक येथे झालेल्या रस्ता रोको आंदोलनात नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता.हा रस्ता रोको जवळपास ४ तास चालला परंतु रोड संदर्भात कोणताही मार्ग निघता नसताना आंदोलनाला आ. संजय देरकर यांनी आंदोलन स्थळी भेट दिली व वेकोली प्रशासनाशी चर्चेअंती वेकोली प्रशासनाकडून लाठी भालर वसाहत रोड करिता WBM रोडची तरतूद करून भविष्यात रोडचे नूतनीकरण करण्याचे लेखी आश्वासन दिले.

या आंदोलनात ग्रामपंचायत सदस्य रिना लाडे, अल्का बोरकुटे,ललिता गुंडुकवार यासह असंख्य महिलांचा,युवकांचा, ग्रामस्थांचा सहभाग दिसून आला. मागील अनेक महिन्यांपासून वेकोली प्रशासनाकडे रस्त्याच्या नूतनीकरणाची मागणी केली होती, परंतु याकडे दुर्लक्ष केल्याने हे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनादरम्यान वेकोलीचे वरिष्ठ अधिकारी यांनी सकारात्मक चर्चा केली. त्यानंतर रस्त्याचे काम ३ ते ४ महिन्यात करण्यात येईल असे लेखी आश्वासनाचे पत्र दिल्यामुळे आंदोलन थांबले. यावेळी शिरपूर पोलिस स्टेशनचे ठाणेदार माधव शिंदे यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

## शेतकऱ्याच्या शेतात ढाळीचे बांध नावालाच?



**महागाव, दि.२९, महासागर प्रतिनिधी**: तालुक्यात कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांच्या शेतामध्ये फुकटामध्ये ढाळी चे बांध टाकून शेतामधले पाणी व्यवस्थित निघून जावे व शेती शेतकऱ्यांना जमीन सुपीक करता यावी म्हणून शासनाने ही योजना अमलात आणली परंतु महागाव येथील ठेकेदार यांनी योजनेचा ठेका घेऊन शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारण्याचे नियोजन आखले आहे.ही योजना उन्हाळ्यामध्ये शेतीमध्ये पीक नसताना शेतकऱ्यांच्या शेतात (ढाळी) बांधाचे काम करायला पाहिजे परंतु मे महिन्यामध्ये कामे सुरू तर केली.

महासागर
यवतमाळ
सोमवार,३० जून २०२५


### लाखखिंड येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**दारव्हा:** तालुक्यातील लाखखिंड येथे नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हाद्वारे संचलित कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना बियाणांबाबत मार्गदर्शन केले. ग्रामीण जागरुकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत चतुर्थ वर्षातील विद्यार्थी ऋतिक आंधळे, प्रतीक चौधरी, यश गावंडे, गौरव इंगोले यांनी शेतकरी आणि ग्रामस्थांना बियाणे लेबलबद्दल माहिती दिली. यामध्ये पैदासकार बियाणे, पायाभूत बियाणे, प्रमाणित बियाणे, नोंदणीकृत बियाणे, मूलभूत बियाणांचे महत्त्व ग्रामस्थांना समजावून सांगितले. या उपक्रमासाठी प्राचार्य पी. ए. खाडे, प्रा. लुंगे, व्ही. यू. देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

# राजर्षी शाहू महाराज जिल्हा भूषण पुरस्काराने जिल्ह्यातील १० कर्तृत्ववान व्यक्ती सन्मानित

## ▪ विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे व्यक्ती जिल्ह्यासाठी अभिमानास्पद - खा.संजय देशमुख

**यवतमाळ, दि.२९, महासागर प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती शिक्षक संघटना जिल्हा शाखा यवतमाळ यांच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीचे औचित्य साधून शासकीय कामकाजा व्यतिरिक्त कालावधीत दि.२६ जुन २०२५ ला सहकार भवन यवतमाळ येथे जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज जिल्हा भूषण पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते.

या पुरस्कार सोहळ्याचे अध्यक्ष यवतमाळ-वाशिम लोकसभा क्षेत्राचे खासदार संजयभाऊ देशमुख यांची उपस्थिती होती. मुख्य अतिथी म्हणून सुप्रसिध्द वक्ते तथा मार्गदर्शक प्रा. प्रविण देशमुख, पतसंस्थेचे अध्यक्ष महेश सोनेकर, जिल्ह्याचे सुपूत्र तथा सत्कारमुर्ती सुभाषजी शर्मा, देवगन चौधरी, आदिबा अनम, डॉ.जयकुमार आडे, अभय देशमुख, तन्मय योगेश देशमुख, तन्मय प्रविण दहेकार, संदीप बाबाराव शिंदे, कु.प्राजक्ता गणेश झलके, राजेश रमेश अक्केवार या दहा रत्नांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन सत्कार सोहळ्याला प्रारंभ झाला. या पुरस्कार सोहळ्याचे प्रास्ताविक पुरुषोत्तम ठोकळ यांनी केले. यावेळी मुख्य मार्गदर्शक प्रा.प्रविण देशमुख यांनी शाहू महाराजांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, शाहू महाराजांनी शिक्षणाला प्रथम प्राधान्य देऊन त्या काळी बहुजनांसाठी ४२९ शाळा काढल्या. वंचित घटकांना समान न्याय देण्याचे कार्य त्यांनी केले. त्याचप्रमाणे सत्कार सोहळ्याचे अध्यक्ष खा.संजयभाऊ देशमुख यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य



करणारे दहा रत्न जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. उल्लेखनिय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान दहा रत्नामुळे यवतमाळ जिल्ह्याची मान उंचावेल असे ते म्हणाले.

यावेळी खा.संजयभाऊ देशमुख यांनी बेघर रुग्णांसाठी खासदार निधीतून साडेसात लाख रुपयांची मदत म्हणून तरतूद करण्यात आली तो निधी उपलब्ध करुन देण्याचे जाहीर केले. यावेळी खा.संजयभाऊ देशमुख यांनी जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या दहा रत्नांचा शाल व श्रीफळ तथा सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार केला व त्यांना राजर्षी शाहू महाराज जिल्हा भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये यु.पी. एस.सी. रँक प्राप्त डॉ.जयकुमार शंकर आडे, आदिबा अनम आयेशा, अशफाक अहमद शेख, अभय दिगांबर देशमुख तन्मय योगेश देशमुख, त्याचप्रमाणे पद्मश्री पुरस्कार प्राप्त तथा नैसर्गिक शेती निष्ठ सुभाषजी शर्मा, सब लेफ्टनंट तन्मय प्रविण दरेकर, संत गाडगेबाबा पुरस्कारप्राप्त संदिप बाबाराव शिंदे, पी.एच.डी.प्राप्त राजेश रमेश अक्केवार, दिवाणी न्यायाधीश प्राजक्ता रमेश झलके, आंतरराष्ट्रीय धावपटू देवगन श्रीरंग चौधरी यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज जिल्हा भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शाल व श्रीफळ देऊन तथा सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी सत्काराला उत्तर देतांना डॉ.जयकुमार आडे, तन्मय दरेकर, संदिप qशदे, प्राजक्ता झलके, राजेश अक्केवार यांनी प्रतिक्रीया व्यक्त केल्या. या पुरस्कार सोहळ्याच्या आयोजनासाठी पुरुषोत्तम ठोकळ, शशीकांत लोळगे, श्याम पहुरकर, नरेश खरतडे, युवराज पत्रे, विनोद खरुलकर, सचिन गायकवाड, अमोल गोपाळ, नरेश भितकर, देव डेबरे, महेंद्र वेरुळकर, राजहंस मेंढे , गोविंद जाधव, सचिन सानप, किशोर उईके, कपिल टोणे, चंद्रशेखर तिखे, आनंद शेंडे, मनीष राठोड, मो.रफीक, झाकीर हुसेन, सारंग भदुरकर, किरण राठोड, प्रकाश सालपे, संतोष मरगडे, निळकंठ कुळसंगे, नरेश कुंभलकर, विश्वास अनभोरे, संजय चुनारकर, राजेश जुनघरे, चंद्रबोधी घायवटे, नंदकिशोर वानखडे, विनोद डाखोरे, क्रांती दिवाकर राऊत, साहेबराव पवार, विजय ढाले, नदिप पटेल, विशाल ठाकरे आदींनी परिश्रम घेतले. सोहळ्याचे संचालन चंद्रशेखर तिखे व विशाल ठाकरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सचिन गायकवाड यांनी मानले, असे राजहंस मेंढे यांनी कळविले आहे.

## राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरीता समिक्षा मडावीची निवड

**पांढरकवडा, दि.२९, महासागर प्रतिनिधी:** २८ जुन ते १ जुलै पर्यत प्रेमनगर आश्रम हरिव्दार येथे संपन्न होत असलेल्या १८ वर्षाआतील मुलींच्या पहिल्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी स्थानिक मित्र क्रीडा मंडळाची खेळाडु कु समिक्षा मडावी हिची विदर्भ संघात निवड करण्यात आली आहे.



अकोला जिल्ह्यातील उमरी येथे संपन्न झालेल्या राज्य अजिक्यपद निवड चाचणी मध्ये कु समिक्षाने यवतमाळ जिल्हा संघाचे प्रतिनिधीत्व केले होते. तिच्या उत्कृष्ट खेळामुळे तिची निवड, निवड समितीने विदर्भ संघात विदर्भाच्या संघात झाली निवड केली आहे. विदर्भ संघाचे सराव शिबिर अकोला येथे पार पडले असुन त्यानंतर हा संघ हरिव्दारकरीता रवाना झाला आहे. कु समिक्षाने याआधी सुध्दा अनेक राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा खेळलेल्या आहे. ती खो खो ची सुध्दा उत्कृष्ट खेळाडु असुन तिने आपल्या निवडीचे श्रेय जिल्हा कबड्डी असोसीएशनचे अध्यक्ष आ. बाळासाहेब मांगुळकर, सचिव नंदु वानखडे, मित्र क्रीडा मंडळाचे अध्यक्ष मदन जिड्डेवार, सचिव सुनिल कोपुलवार, विश्वस्त गणपत डोंगरे, अशोक कुमरे, प्रकाश दर्शनवार, राजु घावडे, दुर्गादास कोरन्नेवार आदिंना दिले आहे. तिला प्रशिक्षक रवि दर्शनवार यांचे मार्गदर्शन लाभले असुन तिच्या या निवडी बद्दल तिचे राम कुमरे, ओमेश दर्शनवार, मनोज राय, राम जिड्डेवार, अजय कुमरे, संजय औदार्य, धिरज रेड्डीवार, आशुतोष जाधव, पंकज भेंडाळे, रितेश मुप्पीडवार, आदिंनी अभिनंदन केले आहे.

## वैद्यकीय व्यवसायाने दिला जीवनातील सर्वोच्च आनंद - डॉ. सुलभा मुंजे

**वणी, दि.२९, महासागर प्रतिनिधी:** वैद्यकीय व्यवसाय हा केवळ एक व्यवसाय नसून तो एक आनंदाचा धर्म आहे. आपल्यासमोर आलेल्या समस्याग्रस्त रुग्णाला समस्या मुक्त होताना पाहणे आणि स्त्री वैद्य म्हणून असंख्य नवीन जीवांच्या जन्म घेताना एक माध्यम होणे हा जीवनातील महान आनंद वैद्यकशास्त्राने प्रदान केला असे विचार सुप्रसिद्ध स्त्रीरोग विशेषज्ञ डॉ. सुलभा मुंजे यांनी व्यक्त केले.




विदर्भ साहित्य संघ शाखा वणी आणि नगर वाचनालय वणी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक महिन्यात आयोजित होत असणाऱ्या माझगाव माझा वक्ता या वैशिष्ट्यपूर्ण मालिकेत व्यक्ती तितक्या प्रकृती या विषयावर त्या व्यक्त होत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी नगर वाचनालयाचे सचिव गजानन कासावार तर प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ साहित्य संघ शाखा वणीचे अध्यक्ष डॉ दिलीप अलोणे उपस्थित होते.

प्रास्ताविकामध्ये डॉ दिलीप अलोणे यांनी या उपक्रमाची पार्श्वभूमी आणि इतिहासावर प्रकाश टाकत डॉ. सुलभा मुंजें सारखी व्यक्ती वणी मध्ये असण्याचा आनंद व्यक्त केला. आपल्या प्रदीर्घकालीन अनुभवावर आधारित व्याख्यानामध्ये आजवर सुमारे सात हजार बाळंतपणे करताना आलेले अनेक वैशिष्ट्यपूर्ण अनुभव त्यांनी कथन केले. अत्यंत अडचणीच्या शस्त्रक्रिया केल्यावर मिळालेल्या आनंदापासून पैसे न देता पळून गेलेल्या रुग्णांपर्यंतचे विविध अनुभव सांगत स्वतःच्या मृत्यूची पसरलेली खोटी बातमी आणि त्यानंतर भेटल्यावर सहकाऱ्यांनी आनंदाने मिठ्या मारत केलेले स्वागत हा हृद्य प्रसंग देखील श्रोत्यांना विशेष भावला.

अध्यक्षीय मनोगतामध्ये गजानन कासावार यांनी इतक्या मोठ्या प्रमाणात त्यांनी केलेल्या कार्याचे अभिनंदन केले. संचालन विदर्भ साहित्य संघ वणी चे सचिव डॉ अभिजित अणे यांनी तर आभार प्रदर्शन अशोक सोनटक्के यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी देवेंद्र भाजीपाले प्रमोद लोणारे आणि राम मेंगावर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## 'महाराष्ट्र व्हिजन डॉक्युमेंट' चर्चासत्र; किन्हीचे सरपंच सहभागी

**राळेगाव** : विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी मुख्य सचिवांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे चर्चासत्र घेतले. यात किन्ही जवादे येथील सरपंच सुधीर पाटील जवादे यांनी सहभाग घेत शासनास सूचना केल्या. महाराष्ट्राचे शहरीकरण करायचे की ग्रामीण विकास करायचा, हे प्रथम निश्चित करावे. यापुढे खेडी ओस पडणार आहेत. खेडेगावात राहायला कोणी तयार नाही. शासनाने ७३ वी घटनादुरुस्ती पूर्णपणे लागू करून पंचायतराज संकल्पना राबवून सत्तेचे विकेंद्रीकरण करावे. केरळच्या धर्तीवर पंचायतराज संकल्पना जनतेपर्यंत पोहोचवून सत्ता जनतेच्या हातात द्यावी. लोक स्वतःहून विकास करतील.

## अर्धवट रस्त्याच्या कामामुळे चिखलातून प्रवास

**उमरखेड, दि.२९, महासागर प्रतिनिधी:** टाकळी गावचा दळणवळणाचा मुख्य रस्ता असून या रस्त्याच्या मागणीसाठी गावाने रस्त्यावर उतरून आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे रस्त्यासाठी ५ कोटी रुपये मंजूर झाले. मात्र मागील तीन वर्षांपासून काम संथगतीने सुरू आहे. अद्यापही रस्त्याचे काम पूर्ण न झाल्याने गावकरी व विद्यार्थ्यांना त्रास सहन करून चिखलातून प्रवास करावा लागत आहे. पहिल्या पावसात गावात येणारी मानव विकासची बस शाळकरी मुलीना नेण्याकरिता आली असता रोडच्या खाली घसरली. सुदैवाने अपघात झाला नाही. या घटनेनंतर बसचालक विद्यार्थ्यांना न घेता बस परत केली. दूध विक्रीसाठी शेतकऱ्यांना शहरात यावे लागते, रुग्ण, गरोदर माता यांना दवाखान्यात दाखल करणे



कठीण झाले आहे. अद्यापही रस्ता पूर्णत्वास गेला नसल्याने नागरिकांना व उमरखेड येथे शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना तारावरची कसरत करावी लागत आहे. पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचल्याने उमरखेड वरून येणाऱ्या शाळेच्या खासगी बसेस रस्ता पाहूनच परत जात आहे. रस्त्याचे काम सुरू असून रस्त्यावर मोठमोठी गिट्टी टाकल्याने प्रवाशांना रस्त्यावरून वाहन चालवणे कठीण झाले आहे. आता पावसाळ्यात रस्ता चिखलाने माखला आहे. अर्धवट रस्ता पूर्ण करण्यात यावा, अशी मागणी होत आहे. तिवडी-टाकळी या रस्त्यासाठी २६ जानेवारी २०२२ रोजी तहसील कार्यालयाच्या प्रांगणात जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष सरोज देशमुख यांच्यासह गावकऱ्यांनी उपोषण केले होते. त्यानंतर प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडल्याने ग्रामस्थांवर गुन्हे दाखल झाले होते. त्यानंतर शोले आंदोलन देखील अनेकवेळा झाले. मात्र रस्ता झाला नसल्याने गावकरी संताप व्यक्त करीत आहेत.

### मोघे महाविद्यालयात शाहू महाराज जयंती साजरी



**पांढरकवडा, दि.२९, महासागर प्रतिनिधी:** : स्थानिक शिवरामजी मोघे महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलन व शाहु महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन करण्यात आली. प्रमुख पाहुणे विजय काकडे यांच्या हस्ते राजर्षी शाहु महाराज यांच्या जीवन कार्यावर आधारीत विचार मंचाचे उदघाटन करण्यात आले. सामाजिक न्याय, शिक्षण आणी ओबीसी हक्कांसाठी शाहु महाराजांची दिलेले योगदान यावर प्राचार्य डॉ अजय सोळंके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ उल्हास राठोड यांनी राजर्षी शाहु महाराज यांच जिवनचरित्र, त्यांचे समाज सुधारणेतील कार्य आणी त्यांचे प्रेरणादायी नेतृत्व यावर आधारीत भाषण दिले. कार्यक्रमाचे संचालन प्रा डॉ अमर वंजारी यांनी तर प्रा डॉ उषा राखुंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## पारवेकर कुलरत्न कोषातील जवाहर

यवतमाळ जिल्ह्यातील पारवेकर घराणे म्हणजे सद्गुणांचा , सद्विचारांचा रत्नकोष आहेत.या रत्नकोषातील अमुल्य कोहिनूर म्हणजे आमचें आधारवड असणारे लोकनेते अण्णासाहेब देशमुख पारवेकर मालक होय.

पारवेकर देशमुख घराण्यातील चौदावे रत्न म्हणजे अण्णासाहेब देशमुख पारवेकर होय.यवतमाळ विधानसभा मतदारसंघाचे त्यांनी प्रतिनिधित्व केलेआहे. स्व. आबासाहेब देशमुख पारवेकर आणि देशमुख पारवेकर परिवाराच्या पुण्याईचा वारसा जोपासणारे कणखर व्यक्तिमत्त्व म्हणजे अण्णासाहेब देशमुख पारवेकर आज त्यांचा ७७ वा वाढदिवस.त्यांना जन्म दिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

समाजात जन्म घेतल्या नंतर समाजाचे आपण देणे लागतो ही सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन सामाजिक विकास आणि उन्नती साठी त्यांनी आपले सर्व आयुष्य खर्ची घातले.

"जो न लोकास कंटाळे,न कंटाळती लोक ज्याला "आशि अव्वल दर्जाची लोकाराधना असलेले ,लोकांचे लोकांसाठी लोकांमधुन निर्मान झालेले व्यक्तिमत्त्व असुन लोकसेवा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव आहेत.

समाज विकास आणि प्रगती साठी वैयक्तिक आयुष्याचा त्याग करून त्यांनी आपले सर्वआयुष्य हे समाजकारण यासाठी खर्ची घातले.राजकारण हे सत्ता प्राप्तीचे साधन नसुन समाज सेवेची सुसंधी देणारे साधन आहे.यावर त्यांची पुर्ण श्रद्धा आहे. अण्णासाहेब यांना आपल्या तत्वांशी तडजोड करणे उभ्या आयुष्यात जमले नाही . पैशाच्या मार्गानी सत्ता आणि पुन्हा सत्तेच्या मार्गानी पैसा या पासुन ते खूप दूर आहेत. अण्णासाहेब देशमुख पारवेकर यांचे मनअत्यंत सात्विक अन साधे आहे. अगदी लवकरच एखाद्या व्यक्तीवर विश्वास ठेवतात .अनेकदा कूंपनानेच शेत खाल्ले याची अनुभूती होते . यवतमाळ जिल्ह्यातील अनेक परिवाराशी त्यांचे पारिवारिक संबंध आहे.आपल्या कडुन संबंध जोपासत आसतांना साहेब कोणतीच चुक करत नाही.



यवतमाळ जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जडणघडणेत अण्णासाहेब देशमुख पारवेकर यांचे कार्य मेलाचा दगड ठरावा असे आहेत.लोकनेते अण्णासाहेब देशमुख पारवेकर मालक साहेब यांना वाढदिवसाच्या मनापासून हार्दिक हार्दिक शुभेच्छा आई जगदंबा माता आपणास उदंड आयुष्य देवो हीच तिच्या चरणी मंगलमय प्रार्थना

▪ **अशोक बेले**, पांढरकवडा

## » संक्षिप्त...

### माजी आमदार डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी



**पुसद** : श्री शिवाजी विद्यालय, जांबबाजार येथे शनिवारी (दि. २८) माजी आमदार डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक दिलीप शिंदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाळा समन्वय समितीचे सदस्य संजय खैरे होते. उपस्थितांसह मुख्याध्यापक कैलास ठेंगे यांनी माजी आमदार डॉ. देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. मान्यवरांसह वैदेही पवार या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सचिन देशमुख यांनी केले. आभार प्रज्ञा ढेकणे यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### शिवसेना पदाधिकाऱ्यांचा सत्कार



**वणी** : वणी विधानसभा क्षेत्रातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ आमदार संजय देरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वसंत जिनिंग हॉलमध्ये उत्साहात पार पडला. तालुका, विभागीय, महिला व युवक अशा सर्व स्तरांवरील जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. नवनियुक्त पदाधिकारी निवडणुकीपूर्वीच निर्णायक कामगिरी करून दाखवतील. ज्या भागात अजून पक्ष बळकट व्हायचा आहे, तिथेही आम्ही झेंडा रोवू, असा विश्वास आमदार संजय देरकर यांनी यावेळी व्यक्त केला. ही संघटना म्हणजे निव्वळ संख्या नव्हे, तर कार्यक्षम नेतृत्वाचे प्रतिनिधित्व आहे, असेही ते म्हणाले. या कार्यक्रमात आमदार संजय देरकर यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला वणी, मारेगाव व झरी तालुक्यातील सर्व नवनियुक्त शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राळेगाव येथे मॉर्निंग ग्रुपतर्फे वृक्षारोपण



**राळेगाव** : येथील मॉर्निंग ग्रुपच्या वतीने तलाव व स्मशानभूमी परिसरात ३५० रोपट्यांची लागवड करण्यात आली. यात प्रामुख्याने कडुलिंब, पिंपळ अशा आरोग्यवर्धक वृक्षांचा समावेश आहे. स्मशानभूमी येथील परिसर देखणा व सुशोभित करण्यासाठीही पुढाकार घेण्यात आला आहे. लोक यात आर्थिक सहभाग नोंदवतात याच माध्यमातून स्मशानभूमी परिसरात लॉन, पिण्याचे पाणी, लाईट आदी व्यवस्था लोकसहभागातून केली. यावेळी भारत ठुणे, जानराव गिरी, किशोर जुनूनकर, प्रदीप ठुणे, राजेंद्र नागपुरे, विनोद नरड, सुनील भामकर, प्रमोद ताकसांडे, संजय पोपट, सतीश डाखोरे, रवींद्र निवल, सुरेश नेहारे, अॅड. किशोर मांडवकर, प्रभाकर रामगडे, भोला हिकरे, प्रशांत तोतला, किशोर होले, रामकृष्ण भोयर, समीर लाखानी, बबलू सय्यद, आशिष इंगळे, रफिक, प्रवीण कोल्हे, नीलेश पोपट, गणेश राऊत आदी उपस्थित होते.

### जगदंबा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे यश



**कळंब:** नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्समार्फत घेण्यात आलेल्या जी-पॅट २०२५ व (नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्यूटिकल एज्युकेशन अॅण्ड रिसर्च) एनआयपीईआर २०२५ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत जगदंबा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, कळंब येथील पदवीधर बॅचमधील सहा विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये मोहित हलमारे, सुदर्शन मारबदे, मोहन सोनुले, अमन बोंद्रे, शीतल बांते, समीक्षा धनुस्कार यांचा समावेश आहे, यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, अभ्यासातील निष्ठा आणि स्वप्नांवर ठेवलेला दृढ विश्वास या बाबी आहेत. संस्थेने विद्यार्थ्यांमध्ये नेहमीच अभ्यासावरील प्रेम निर्माण केले असून, त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांसाठी सज्ज करण्याचे काम प्रभावीपणे पार पाडले आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. शीतल वातिले, संचालक पवन वातिले व प्राचार्य डॉ. राहुल बिजवार, विभाग प्रमुख प्रा. सुबोध ढोणे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

### आश्रमशाळेतील साहिलची निवड

**आर्णी:** साहिल रवींद्र वाकोडे याचा आयआयटी मुंबईसाठी प्रवेश निश्चित झाला आहे. बहुजन कल्याण विभागांतर्गत चालविल्या जाणाऱ्या अरुणावती शिक्षण प्रसारक मंडळ हेटी (य.) अंतर्गत येणाऱ्या श्री. शिवाजीराव मोघे कला व विज्ञान आश्रमशाळा हेटी (य.), ता. आर्णी या शाळेचा साहिल विद्यार्थी आहे. २०२४-२५ या वर्षात तो विज्ञान शाखेचा विद्यार्थी होता. साहिलला ७६ टक्के गुण मिळाले होते.

: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक : -२०१०/३५७९९-
महासागर यवतमाळ
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्णा तन्मुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, बस स्टँड चौक, होटल प्रकाश जवळ, यवतमाळ येथे प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनमुखदास चांडक मुख्य कार्यालय पोन-०७१२-२७६७६२८-९९२२९७००२३ स्थानिक संपादक-रघुवीरसिंह चौहान फोन-९४२३४३३२४४ (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहिल.)

